## प्रकरण चौथे

# 'शूद्र' या कादंबरीचे वाङ्मयीन विशेष

● प्रस्तावना

१. निवेदनपद्धती व भाषा

२. प्रमाणभाषेचा वापर

३. 'शूद्र'ची प्रादेशिकता

४. 'शूद्र'मध्ये येणारी व्यक्तिचित्रणे

५. 'शूद्र'मधील पौराणिक वातावरण

६. 'शूद्र'मधील सामाजिकता

७. सारांश

● निष्कर्ष

# प्रकरण चौथे

# 'शूद्र' या कादंबरीचे वाङ्मयीन विशेष

भाषा ही एक सामाजिक संस्था आहे. भाषा आणि मानव यांचा एकमेकांशी असलेला संबंध अतुट, सर्वस्पर्शी व पुरातन आहे. मानवी विचार, संकल्पना, अनुभव या सर्वच गोष्टी भाषेशी निगडित आहेत. प्रत्येक भाषेत त्या-त्या समाजाच्या गरजेनुसार अर्थ व्यक्त करण्याची क्षमता असते. भाषेमुळेच अमूर्त कल्पना, विचार व तात्विक चर्चा, शास्त्रीय मीमांसा शक्य असतात. भाषेच्या अंगी सर्जनशक्ती असल्यामुळे भाषेत सौंदर्याकृती निर्माण होऊ शकतात.

१९६० नंतर मराठी साहित्यात दलित साहित्याचा एक जोमदारप्रवाह निर्माण झाला. या साहित्याने आपला एक वेगळा ठसा मराठी साहित्यात उमटविला. आशय आणि अभिव्यक्तीच्या संदर्भातील दलित कादंबरीचे वेगळेपण चटकन लक्षात येते. संख्येपेक्षा गुणात्मकदृष्ट्या वेगवेगळ्या स्तरातील दलितांचे जीवनचित्रण, त्यांचे विविध प्रश्न हाताळणाऱ्या विविध कादंबऱ्या दलित साहित्याने दिल्या. दलित जीवन हा कादंबरीचा विषय होऊ शकतो, हे या कादंबऱ्यांनी सिद्ध केले आहे. दलित कादंबरी ही परंपरेतून नव्हे तर प्रयोजनातून निर्माण झाली आहे. दलित कादंबरीच्या अभिव्यक्तीपेक्षा तिचा आशय अतिशय महत्त्वाचा आहे. शोषण, पीडा व लाचारी पत्करून जगणाऱ्या दलित समाजाला मोकळा श्वास घेण्याचे स्वातंत्र्य दलित कादंबरीने दिले आहे.

प्राचीन काळापासून सहन करीत आलेल्या अस्पृश्यतेच्या वेदनेला दलित कादंबरीने अधिक महत्त्व दिले आहे. बौद्ध धर्मांतरापूर्वी आणि धर्मांतरानंतरही दलित

समाजाला सहन कराव्या लागलेल्या हिडीसफिडीसपणाचे चित्रण, अस्पृश्यत्वामधून निर्माण होणारा संघर्ष, होणारा छळ यांचे चित्रण ही दलित कादंबरी करते. दलित कादंबरीचे निराळेपण तिच्या अभिव्यक्तीमध्ये आहे. दलितांनी जे दु:ख जसे अनुभवले तसे ते लेखणीच्या सहाय्याने उतरविले. दलित कादंबरीकार आपल्याला कादंबरी लिहायची आहे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेऊन आपला अनुभव व्यक्त करीत नाही. अभिव्यक्तीपेक्षाही तो आशयाला महत्त्व देतो. आशयाला अनुरूप अशीच भाषाभिव्यक्ती दलित कादंबरीमध्ये व्यक्त होताना दिसते. अत्यंत प्रत्ययकारी बोली भाषा किंवा प्रमाण भाषा यांचा वापर करून दलित जीवनाचे विविधांगाने दलित कादंबरी चित्रण करताना दिसते.

सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक स्वातंत्र्यापासून वंचित राहिलेल्या दलित समाजाच्या दु:खांना दलित कादंबरीने वाचा फोडली. डॉ. आंबेडकरांनी सांगितलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता या तत्त्वत्रयींची ओळख झाल्यावर आपणही लिहू शकतो, बोलू शकतो याचे भान आल्यावर दलित कादंबरीकार अतिशय आत्मविश्वासाने हिंदू धर्मातील रूढी-परंपरांना धक्के देत लिहू लागला. आतापर्यंतच्या बेगडी वातावरणामध्ये सिद्ध झालेल्या कादंबरी वाङ्मयामध्ये दलितांचे सत्यचित्र कुठेच नाही या भावनेने अस्वस्थ झालेल्या दलित कादंबरीकाराने आपल्या समाजातील दु:खांचा वास्तव आलेख तीव्रपणे मांडला. म. फुले, गौतम बुद्ध, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेला दलितांमधील आत्मविश्वास, दलित चळवळीचा प्रभाव, सामाजिक बांधिलकी या सर्वांच्या उपलब्धीतून दलित कादंबरी आपला एक वेगळा ठसा मराठी वाङ्मयामध्ये निर्माण करताना दिसते.

सुधाकर गायकवाड यांची 'शूद्र' ही कादंबरी अशीच वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी. ही कादंबरी वाचकाला अंत:र्बाह्य हादरवून सोडते. तिचा विषय जसा वेगळा आहे तशीच तिची अभिव्यक्तीही निराळी आहे. १९८० साली प्रकाशित झालेली ही कादंबरी ब्राह्मण-क्षत्रियांची लाचारी न पत्करता आपण आपल्या बांधवांची संघटना उभी करायची आणि आपले स्वतंत्र राज्य स्थापन करायचे अशी महत्त्वाकांक्षा बाळगणाऱ्या नागनाथचा जीवनसंघर्ष उभा करते. हा संघर्ष उभा करताना नेहमीच्या दलित कादंबरीचे आशय-अभिव्यक्तीचे स्वरुप न स्वीकारता ती आपले वेगळे अस्तित्व साकारताना दिसते. या प्रकरणात 'शूद्र' या कादंबरीच्या वेगळेपणाचा, वाङ्मयीन विशेषांचा आढावा घ्यायचा आहे.

## १. निवेदनपद्धती व भाषा :

कादंबरी वाङ्मयाची पारंपारिक व ठराविक चौकट ओलांडून, दलित कादंबरीने जीवनसंबंद्ध वास्तवाला महत्त्वाचे स्थान दिले. बाह्य मांडणी तशीच वाटत असली तरी दलित कादंबरीच्या आशयाचा आंतररंग भिन्न असतो. वर्णनपरता, कल्पनाविलास आणि आलंकारिकतेला फाटा देऊन दलित कादंबरीने प्रत्यक्षातील जीवनानुभव साकार केले आहेत. दलित कादंबरीतील सून्न करणारे अनुभव वाचकाला अंतर्मुखही करतात. दलित कादंबऱ्यातून व्यक्त होणारी पात्रे वेगवेगळ्या प्रादेशिक वैशिष्ट्यांनी समृद्ध असल्यामुळे प्रादेशिक भाषांचे वेगळेपणही दलित कादंबरीतून व्यक्त झालेले दिसते.

'शूद्र' या कादंबरीतील सुधाकर गायकवाड यांच्या निवेदनात सहजता आहे. त्यांची अल्पाक्षरी भाषा लहान-लहान वाक्यातून खूप काही सांगणारी आहे. छोट्या-छोट्या प्रसंगांची मांडणी नागनाथचा जीवनपट उलघडताना दिसते. ''म्हाताऱ्याचा

शहाणपणा म्हणजे आयुष्याच्या सुरक्षिततेसाठी सभोवती बांधलेली संरक्षण भिंतच.''[१] यासारख्या छोट्या छोट्या वाक्यातून लेखकाची प्रतिभा किती उच्चकोटीची आहे हे सहज ध्यानात येते. तृतीयपुरूषी एकवचनी निवेदन पद्धतीतून लेखक प्रसंगानुरूप कादंबरीला न्याय देताना दिसतो.

रूपक, प्रतीक, प्रतिमा यांचा वापर सुधाकर गायकवाड लेखनाच्या ओघातच करताना दिसतात, सुधाकर गायकवाडांची लेखनशैली खांडेकर-शिवाजी सावंत यांच्या लेखनशैलीप्रमाणेच आलंकारिकही होताना दिसते. ''खरे शौर्य म्हणजे माणसातील जहरी विषाचा फळासारखा रस करणे.''[२] किंवा ''काटेरी निवडुंगासारखे काटेरी आयुष्य घेऊन उन्हे झेलण्यासाठीच आपण जन्माला आलो.''[३] यासारख्या वाक्यातून उपमा-रूपकांची खैरात निर्माण करतात. प्रतिमांचा वापरही लेखक जोरकसपणे करताना दिसतात. 'अंगाला दंश करणारे जहरी शब्द', 'ट्वी ऽ ट्वी ऽ करणारा निळ्या गळ्याचा पक्षी', 'अनंत युगांपासून डाग धुणारे पाणी' यासारख्या प्रतिमा कादंबरीला वेगळ्या उंचीवर घेऊन जातात. आशयाचे एक अविभाज्य अंग म्हणून रूपक, प्रतीक, प्रतिमांचा उपयोग 'शूद्र' या दलित कादंबरीमध्ये झालेला दिसतो.

खरं तर दलित कादंबरीची भाषा रूढ संकेतांना फाटा देणारी आहे. पण 'शूद्र' मध्ये मात्र लेखक बोलीभाषेपेक्षा प्रमाणभाषेतूनच निवेदन करताना दिसतात. प्राचीन काळातील पार्श्वभूमी घडणारे कथानक असल्यामुळे लेखक प्रमाणभाषेतच निवेदन करताना दिसतात. ''भिकेचं कसलं लेका ? आपुन गरीब लोकं, मायेनी देतात वाडवडलापासनं, बाय आण ती जोगली इकड.''[४] ही बा. स. हाटे यांची

'युगविधान' मधील शैली आणि "अरे, तू अजून लहान आहेस वाटते ! परमेश्वराच्या पायापासून आपला जन्म झाला. तेव्हापासून छातीवर शूद्र हा कलंग घेऊन आपण वापरू लागलो."[५] यासारख्या वाक्यातून दिसून येणारी शैली यात खूपच वेगळेपण आहे.

सुधाकर गायकवाड दलितांच्या जीवनातील नित्याच्याच प्रसंगांतून त्यांच्या जीवनातील अपार दारिद्र्य आणि करूणामय जीवन मांडतात. त्याचबरोबर कारुण्य, मिश्किलपणा, उपहास यांचे बेमालूमपणे मिश्रण त्यांच्या निवेदनात दिसून येते. "अंगावर मोरपीस फिरवल्याप्रमाणे वाटणारी सकाळची कोवळी उन्हं आता तप्त लोहाने डाग द्यावा त्याप्रमाणे अंगाचे लचके तोडत होती. पृथ्वीवर निखारे ठेवल्याप्रमाणे भुसभुशीत फुफाट्यातून उष्ण झळा येत होत्या."[६] यासारख्या आलंकारिक वर्णनाचा मोह लेखकाला सुटता सुटत नाही. परंतु खरं तर यामुळेच ही कादंबरी एक वेगळेपण जपताना दिसते. सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' या कादंबरीत दलितांच्या वेदना-विद्रोहाबरोबरच भाषेतील माधुर्य आणि लालित्यही आहे.

निवेदनातील लकबी, प्रसंगांच्या जिवंतपणासाठी वापरलेल्या प्रतिमा व प्रतिके यांचे सुंदर मिश्रण प्रमाणभाषेतील वास्तव लेखन, दलित समाजाची आणि दलितांच्या दु:ख दारिद्र्याची परिस्थिती समजण्यासाठी फारच परिणामकारक ठरते.

### २. प्रमाणभाषेचा वापर :

सुधाकर गायकवाड 'शूद्र' मध्ये तृतीयपुरुषी निवेदनपद्धतीचा वापर केला आहे. कादंबरीच्या सुरूवातीपासूनच लेखक प्रमाणभाषेचा वापर करताना दिसतात. कादंबरीतील निसर्ग, व्यक्तिरेखा, संवाद, वातावरण इ. सर्वच प्रमाणभाषेतून

वाचकाच्यासमोर येताना दिसतात. त्यामुळे यातील भाषा समजताना कोणत्याही अडचणी निर्माण होत नाहीत. नागनाथला जे सर्व वाईट अनुभव आले आहेत ते सांगण्यासाठी लेखक प्रमाणभाषेचाच वापर करताना दिसतात. त्यामुळे 'शूद्र' चे वाङ्मयीन सौंदर्य वाढण्यासाठी मदतच झाली आहे. मनुप्रणित समाजव्यवस्था संपूर्ण अस्पृश्य जातीला कशी दयनीय बनवते याचे वास्तव दर्शन करण्यासाठी लेखकाने प्रमाणभाषेलाच जवळ केलेले दिसते.

'शूद्र' या कादंबरीची कथा नीतिकथा, जातककथा यासारखी वाटते. लहान मुलांना परीकथा समजावून सांगावी त्याप्रमाणे परंतु थोड्याशा तात्त्विक भाषेत ही कथा सांगितली असल्यामुळे लेखकाने बोलीभाषेच्या वापराचा अट्टहास धरलेला दिसत नाही. ''या जंगलातून वळणे घेत आयुष्य कोणत्या हिरव्या साम्राज्याचा अधिपती होणार, कोणास ठाऊक ! पण आपणाला हवे तरी काय ? दहा साम्राज्यास एका बाणाखाली आणणारा राजमुकुट ! की वेलीवरचे सूर्योन्मुख फूल छातीशी कवटाळण्याचा निरागस अधिकार ? यापेक्षा वेगळा असलेला संगीताप्रमाणे धुंद करत नसानसांतून वाहणारा पत्नीचा स्पर्श ? तो ओठात हसला. निरोप घेताना दुःख-व्याकुळ झालेला पत्नीचा चेहरा, नर्तनाच्यावेळी आपणास गोंजारत असणारी तिची कौतुकभरली नजर, वस्त्र घेतले नाहीत म्हणून रुसलेली ती..... आणि रक्तात दंश करणारे ऋषिकन्येच्या मूर्च्छित देहाला दिलेले आलिंगन, पाणी पिऊनही घसा कोरडा करत सतत अतृप्त ठेवणारे तिचे चुंबन ! तो शहारला, त्याला योग्याचा उपदेश आठवला. सर्व विश्व मिथ्या आहे.''[७] यासारख्या उताऱ्यातून लेखकाने प्रमाणभाषेचा केलेला नितांत सुंदर वापर सहजपणे लक्षात येतो.

तुलनात्मकदृष्ट्या पाहायचच झालं तर अशोक व्हटकर यांच्या 'मेलंलं पाणी' या कादंबरीचे उदाहरण देता येईल. या कादंबरीतील उच्चवर्णीय समाजातील नाना हा ग्रामीण बोलीचाच वापर करताना दिसतो, तो म्हणतो, ''नगं बाबा, म्हाराची हिर नगं आमानी, म्हार कुटं आपुन कुटं, आपली जात लय दांडगी हाय''[८] पण 'शूद्र' मधील उच्चवर्णीय असणारा ब्राह्मण मात्र प्रमाणभाषेचाच वापर करताना दिसतो – ''मुली, एक वेळ तू तडफडत असलेल्या कुत्र्यास पाणी पाजलेस तर तुला मोठे पुण्य मिळेल. परंतु ज्याच्या अंगा-अंगावर पापांनी जखमा केल्या आहेत त्या शूद्राला पाणी पाजून तू आयुष्यातले एखादे पुण्य का कमी करून घेते आहेस ?''[९] यासारख्या वर्णनातून लेखक प्रमाणभाषेचा चपखलपणे वापर करताना दिसतो.

## ३. 'शूद्र' ची प्रादेशिकता :

प्रादेशिकता ही वाङ्मयाला लाभलेली एक गुणवत्ता असून भौगोलिक व सांस्कृतिक वातावरणाला मौलिकता देणारी ती एक अतिशय हितावह प्रवृत्ती आहे. नागर चित्रणापासून प्रादेशिक चित्रण वेगळे असते. ग्रामीण भागातील परिसर हा औद्योगिक-नागर संस्कृतीपासून वंचित राहिलेला असतो त्यामुळेच प्रादेशिक गुणवैशिष्ट्यांचा त्या-त्या ठिकाणी आढळ होत असतो. विशिष्ट प्रदेशातील समस्या, सामाजिक-राजकीय-आर्थिक परिवर्तन, लोकांमधील नातेसंबंध याबरोबरच तेथील भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती यातून प्रादेशिकतेचा अंतर्भाव होत असतो. प्रादेशिकता म्हणजे नैसर्गिक व सांस्कृतिक संचिताला प्राधान्य देणारी वाङ्मयीन वृत्ती होय, असेच आपल्याला यावरून म्हणता येईल.

डॉ. आनंद यादव प्रादेशिक कादंबरीची संकल्पना मांडताना म्हणतात, "एखाद्या विशिष्ट प्रदेशातील लोकजीवन, संस्कृती, परंपरा, जीवनसंकेत, रीती, समुहातील भावभावना आणि या सर्वातून निर्माण झालेल्या समस्या आणि जीवननाट्य यांचे दर्शन घडविण्याच्या उद्देशाने ज्या कादंबऱ्या लिहिल्या जातात त्यांना 'प्रादेशिक कादंबरी' असे म्हणता येईल."[१०] येथे एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते ती ही की, स्वतंत्र व्यक्तिमत्व असणारा प्रदेश जेव्हा वाङ्मयातून दृष्टीस येतो तेव्हा त्यास स्वत:चे व्यक्तिमत्व प्राप्त होते आणि त्या व्यक्तिमत्वाच्या सानिध्यात राहणारी माणसेही साहजिकच बदलेली असतात.

'शूद्र' या कादंबरीलाही वत्तनीया नगर आणि तेथील परिसर यांची प्रादेशिकता चिकटल्यामुळे या कादंबरीचे वाङ्मयीन सौंदर्य आणखी वाढलेले आहे. 'शूद्र' मधील अनेक घटना-प्रसंग जिवंत उभे राहतात ते या प्रादेशिकतेमुळेच. "त्याने सहज पाठी वळून पाहिले. वत्तनीया नगर उंचवट्याआडून नखाएवढे दिसत होते. खाली वाकून त्याने कमरेच्या वस्त्राने चेहरा पुसला नि पुन्हा एकदा पावलाला गती दिली. प्रचंड शिळेला वळसा घालून वाट आता सापाप्रमाणे अंग मोडीत टेकडीवर चढली होती."[११] अशा प्रकारच्या वर्णनातून सुधाकर गायकवाड वत्तनीया नगराच्या आसपासच्या प्रदेशाचे वर्णन करतात दिसतात. वत्तनीया नगर, दक्षिणेतील वेंगयन राज्य, तिथला डोंगर, आसपासचा निसर्ग यांनी या कादंबरीच्या प्रादेशिकतेत बहर आणला आहे. "डोंगराच्या मुकुटावर लाल तेजस्वी मण्याप्रमाणे सूर्य दिसत होता, सूर्याच्या अंगातून सतत स्फोट होत असल्याप्रमाणे गडद लाल रंग आकाशाच्या वस्त्रावर फेकले जात होते."[१२] यासारखे वर्णन आणि "आता तो डोंगराच्या पायथ्याशी आला होता.

समोर सभोवती छातीवरच्या केसांप्रमाणे दाटपणे हिरवे वृक्ष डोलत होते. ते फार मोठे असे विस्तीर्ण अरण्य होते. आता त्याच्या घशाला विलक्षण कोरड पडली होती. त्याने सभोवार दूर नजर फेकली. पण हिरव्या रंगाशिवाय त्याला काहीच दिसले नाही.''[१३] यासारख्या वर्णनातून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, या कादंबरीतील प्रादेशिकता त्याचबरोबर त्यातून येणारे निसर्गवर्णन हे केवळ यायचे म्हणून येत नाही तर ते कादंबरीच्या कथानकाला पुढे घेऊन जाण्याचे काम करते.

अशा प्रकारे सुधाकर गायकवाड यांनी वत्तनीया नगर, वेंगयन राज्य, नागनाथची गावाकुसाबाहेरची वस्ती, डोंगर परिसर, तिथला निसर्ग यांना या कादंबरीच्या प्रादेशिकतेचा अविभाज्य घटक बनविलेले आहे.

## ४. 'शूद्र' मध्ये येणारी व्यक्तिचित्रणे

व्यक्तिचित्रणे ही कोणत्याही कादंबरीचा महत्त्वाचा घटक असतात. कादंबरीत घडणाऱ्या घटना ज्यांच्यामुळे घडत असतात त्यांना व्यक्तिरेखा असे म्हणतात. कादंबरीच्या कथानकाला पूर्णत्व प्राप्त करून देण्यास व्यक्तिरेखांचा महत्त्वाचा वाटा असतो. मनुष्यजीवनाचे चित्रण साहित्यातून होत असल्याने त्याच्या कथानकात व्यक्तिरेखांना महत्त्वाचे स्थान असते. व्यक्तिरेखाटनाबाबत जान्हवी संत म्हणतात, ''मानवी स्वभावाचे विविध नमुने कादंबरीत चितारले जातात. यास व्यक्तिचित्रण किंवा चरित्रचित्रण असे म्हणतात, हे व्यक्तिचित्रण जितके स्वाभाविक असेल, तितकी ती कादंबरी वाचकाला आवडेल.''[१४]

'शूद्र' मध्ये येणाऱ्या व्यक्तिरेखांमध्ये नागनाथ, सागला, नागनाथचे वडील, सब्बबुद्ध भिक्खू, ऋषिकन्या, ऋषिमुनी, विसपाल, उन्ना, छन्ना, राजाचे उन्मत्त दास

यांच्या व्यक्तिरेखातून ही कादंबरी रूपास येताना दिसते. या कादंबरीतील पात्रे मोजकीच आलेली असली तरी ती कादंबरीचा आशय समृद्ध करताना दिसतात. कादंबरीकाराने मोजक्याच पात्रांच्या सहाय्याने गुंतागुंत न करता कादंबरीचे कथानक उलगडून दाखविले आहे. कमीतकमी पात्रांच्या सहाय्याने 'शूद्र' या कादंबरीत सुधाकर गायकवाड उठावदारपणा आणतात. यातील प्रत्येक व्यक्तिरेखा कथानकाशी समरस झालेली दिसते. त्याचबरोबर लेखकही त्या व्यक्तिरेखांच्या भावभावनांशी एकरूप होऊन लेखन करताना दिसतो. 'शूद्र' मधील कोणतेच पात्र लेखकाने बळेहून घुसड्यासारखे वाटत नाही. येथे 'शूद्र' मधील व्यक्तिरेखांचा सविस्तरपणे अभ्यास करणे गरजेचे आहे.

**४.१ नागनाथ –**

'शूद्र' या कादंबरीतील नायक नागनाथ याच्या भोवतीच या कादंबरीचे कथानक फुलताना दिसते. 'शूद्र' हा डाग माथी घेऊन जन्माला आलेला नागनाथ अस्पृश्यतेचा डाग पुसून टाकण्यासाठी शेवटपर्यंत लढत राहतो. त्याची ही धडपड म्हणजेच 'शूद्र' ही कादंबरी होय. वडिलांवर झालेल्या अन्यायामुळे पेटलेला नागनाथ जेव्हा प्रवासाला निघतो तेव्हा त्याला एक वृद्ध भेटतो, तो त्याला त्याची 'रक्तात डसणारी व्यथा' सांगतो. ही व्यथा ऐकून नागनाथ त्याला 'शूद्र' हा जन्मत:च चिकटलेला डाग पुसून टाकण्याचे वचन देतो. शूद्र म्हणून मरण्यापेक्षा जे आम्हाला शूद्र म्हणतात त्या ब्राह्मण-क्षत्रियांनी व्यापलेली भूमीच नष्ट करण्याची प्रतिज्ञा नागनाथ करतो. सर्व कौटुंबिक संसार सोडून नागनाथ हातात बाण घेऊन लढायला निघतो.

पुढे त्याला एक सुंदर ऋषिकन्या भेटते. तिच्याकडून अपमानित झालेल्या नागनाथचा स्वाभिमान डिवचला जातो. अस्पृश्यतेच्या वेदनेतून सूडभावनेने तो तिची चुंबने घेतो. पण एका अबलेवर सूड उगवून त्याच्या मनातील सल कमी होणार होती का ? नक्कीच नाही. नागनाथच्या अपयशाचेच हे सूचन होते. नागनाथकडून घडलेली ही कृती त्याच्यातील कमीपणाचे लक्षण होती की काय ? असे म्हणायची वेळ येते. पुढे त्याला योगी भेटतो, तेथेही तो अपमानित होतो. वृद्ध स्त्री भेटते. तिचा मुलगा 'अम्माला' याला राजाच्या दूतांनी भाल्याने मारलेले असते. सवर्णीय लोक अवर्णीयांचा नाहक छळ कसा करतात याचे दर्शन नागनाथला पुन्हा होते. दरम्यान राजाच्या सैन्याने नागनाथच्या वस्तीला बेचिराख केलेले असते. स्त्रियांवर लैंगिक अत्याचार केलेले असतात, वस्तीत एकही श्वास जिवंत उरत नाही.

अशा अवस्थेतच नागनाथला सब्बबुद्ध भिक्कू भेटतात. त्यांच्याकडील बौद्धतत्वज्ञानाने नागनाथ प्रभावी होतो आणि नागनाथचे रुपांतर भिक्कू विश्वानंद मध्ये होते. इथे नागनाथ स्वत:चा प्रश्न विसरतो. पुढे राजाकडून सर्व भिक्कूंचीही हत्या केली जाते. यातून पेटून उठलेला नागनाथ भिक्कूची वस्त्रे गुंडाळून पुन्हा हाती धनुष्यबाण घेतो. रक्ताचे पाट वाहतात. शेवटी नागनाथही घायाळ होतो. या अवस्थेतच ऋषिकन्येच्यासमोर तो येतो. तहानलेल्या नागनाथच्या तोंडात अखेरच्या क्षणी ती ऋषिकन्या पाणी घालत नाही. उलट त्याच्या छातीत बाण खुपसते. अखेरच्या क्षणी नागनाथ म्हणतो, ''ऋषिकन्ये ! अंशत: का असेना पण तो माझा विजयच आहे. सर्वस्वी माझा विजय आहे ! माझ्यानंतर माझ्यासारखाच दुसरा कुणीतरी येईल नि तुझ्या जागी दुसरी कोणीतरी. नि त्या दोघात आपल्यासारखाच परत झगडा. हे

चक्र असेच चालत राहणार. शेवटच्या माझ्या अंतिम विजयापर्यंत व तुझ्या अंतिम पराभवापर्यंत !''[१५] इथे नागनाथला एक गोष्ट सूचित करायची आहे की, एक दिवस दलितांना, शूद्रांना त्यांचा न्याय मिळेल. नागनाथच्या रुपाने शूद्रांच्या मनात असणारा अन्याय, संघर्ष, दास्यत्व झुगारण्याची प्रचंड ताकद सुधाकर गायकवाड यांनी दमदार व तीव्रतेने व्यक्त केली आहे.

'शूद्र' हा डाग पुसण्यासाठी धडपडणारा नागनाथ, वृद्धाचे व स्त्रीचे दु:ख ऐकून पेटून उठलेला नागनाथ, आपल्या मित्रांना अन्यायाविरुद्ध लढण्यास प्रवृत्त करणारा नागनाथ, अस्पृश्य स्त्रियांवरील अत्याचाराने अगतिक झालेला नागनाथ, ऋषिकन्येकडून अपमानित झालेला नागनाथ, बौद्ध तत्त्वज्ञानाने भारावलेला नागनाथ, शेवटच्या श्वासापर्यंत राजाच्या सैनिकांबरोबर त्वेशाने लढणारा नागनाथ व मरतानाही 'शूद्र' हा डाग कधीतरी पुसला जाईल असा आशावाद व्यक्त करणारा नागनाथ, अशी कितीतरी रूपे सुधाकर गायकवाड नागनाथच्या रूपाने वाचकांसमोर उभी करतात.

''भले मला माझी वस्ती सोडायला लागली तरी हरकत नाही पण मी शूद्र म्हणून जगणार नाही.''(पृष्ठ क्र. १६) अशी प्रतिज्ञा करणारा नागनाथ अतिशय शूर, धाडसी, पराक्रमी आहे. तसाच तो भावनिकही आहे. अगतिक आहे. नागनाथ हाच 'शूद्र' या कादंबरीचा आत्मा आहे, केंद्रबिंदू आहे, असे वरील विवेचनावरून आपल्या लक्षात येते.

### ४.२ वृद्ध

कादंबरीच्या सुरवातीसच नागनाथला भेटलेला कमकुवत, कमरेत वाकलेला, कुबड आलेला, चेहऱ्यावर सुरकुत्या असलेला, पांढरीशुभ्र दाढी असलेला हा वृद्धच

खऱ्या अर्थाने नागनाथला संघर्षप्रवण होण्यास मदत करतो. 'शूद्र' हा डाग जन्मभर घेऊन जगलेल्या ह्या वृद्धाला अपार दु:खवेदनेतून जावे लागले होते. राजाच्या उन्मत्त दासांनी त्याच्या वडिलांना हालहाल करून मारले होते. केवळ शूद्र म्हणून बापाची क्रूर हत्या का व्हावी हा पहिला प्रश्न घेऊन तो भटकत होता. वयाने वृद्ध असलेला हा माणूस मनाने अजूनही तितकाच खंबीर होता. "अरे, चार-पाच घास आतड्यात घालून दगडासारखे जगण्यापेक्षा थोडे स्वाभिमानाने का जगत नाहीस? हा, पण त्यासाठी छातीवर बाण घेण्याची तयारी असली पाहिजे." [१६] यासारख्या उद्‌गारातून आपल्या समाजबांधवांना गुलामगिरीतून मुक्त करण्याची त्याची मनिषा थक्क करणारी आहे.

**४.३ नागनाथचे बाबा :**

अतिशय स्वाभिमानी असणाऱ्या नागनाथचे बाबा मात्र अत्यंत सोशिक आहेत. उच्चवर्णीयांच्या अन्यायाला ते आपले कर्म समजून बसले आहेत. दलितांची दलितत्व स्वीकारण्याची मानसिकता त्यांच्या व्यक्तिमत्वातून दिसून येते. परमेश्वराच्या पायापासून आपला जन्म झाला आहे अशी त्यांची धारणा बनली आहे ती केवळ अज्ञानामुळे. "म्हाताऱ्यांचा शहाणपणा म्हणजे आयुष्याच्या सुरक्षिततेसाठी सभोवती बांधलेली संरक्षण भिंतच"[१७] या छन्नाच्या उद्‌गारातून नागनाथच्या बाबांचे व्यक्तिमत्व स्पष्ट होताना दिसते.

असे असले तरी नागनाथ जेव्हा सर्व गोष्टी त्याच्या बाबांना पटवून देतो तेव्हा "पोरांनो यशस्वी व्हा!" असा आशीर्वाद द्यायलाही ते विसरत नाहीत. एकूणच

नागनाथच्या वडिलांची व्यक्तिरेखा रेखाटताना सुधाकर गायकवाड यांनी एक वडील म्हणून त्यांना असणारी भीती, अगतिकता यांचे वास्तवदर्शन उभे केले आहे.

**४.४ सागला :**

हा नागनाथचा लहान भाऊ. कोणत्याही ब्राह्मणाचे तोंड बंद करू शकेल इतकी त्याला बुद्धी असते. वेदांच्या अध्ययनात तो अतिशय चाणाक्ष आहे. नागनाथने जेव्हा बंड पुकारले होते तेव्हा सागलाही आपल्याला माहीत असणाऱ्या तत्त्वज्ञानाने सर्व सवंगड्यांना ज्ञानी बनविण्याचा प्रयत्न करत होता. ब्राह्मणाच्या आश्रमातील विद्या तो चोरून ऐकत होता आणि त्यातूनच तो त्यात पारंगत झालेला होता.

**४.५ छन्ना :**

हा नागनाथचा अतिशय जिवलग मित्र. नागनाथच्या बंडाच्या वेळी छन्ना त्याला पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन देतो. ''तुम्हाला या सुरक्षित भिंतीच्या आत किड्यासारखे जगायचे असेल तर खुशाल जगा; आम्ही जगणार नाही. नाथ तू मुळीच घाबरू नकोस. आम्ही तुझ्यासाठी सर्व तरूण सैन्य उभे करतो. पण तू म्हणतोस त्याप्रमाणे आयुष्याचा चिखल करणारा हा शूद्र डाग नाहीसा करायचा म्हणजे करायचाच.''[१८] अशी प्रतिज्ञा करणारा छन्ना अतिशय धाडसी वाटतो. त्याच्यासारख्याच्या सहकार्यामुळेच – प्रेरणेमुळेच नागनाथमध्ये लढण्याचे बळ निर्माण होते.

**४.६ ऋषिकन्या :**

'शूद्र' या कादंबरीतील ऋषिकन्या ही तत्कालीन उच्चवर्णीयांचे प्रातिनिधिक रूपच म्हणावे लागेल. नुकतीच स्नान करून आलेली, कमरेभोवती तलम वस्त्र

असलेली, अतिशय सुंदर अशी ऋषिकन्या अंत:र्मनातून मात्र जातीयता, कर्मकांड यांनी ग्रासली होती. ''मी फक्त शब्द थुंकला तर तुझे शिर धडावेगळे केले जाईल. तरी मी तुला क्षमा करते. तू तेथून निघून जा. या झऱ्याचे पाणी फक्त आमच्यासाठी आहे. त्याला तुझे पापी बोट लावून ते विटाळू नकोस.''[१९] असे म्हणून नागनाथला अपमानित करणारी ऋषिकन्या चातुर्वर्ण्यसमाजव्यवस्थेचे उत्तम उदाहरण आहे.

कादंबरीच्या शेवटी घायाळ नागनाथ जेव्हा ऋषिकन्येच्या आश्रमाजवळ पोहचतो तेव्हा ती त्याला मरतानाही पाणी देत नाही. उलट ''नीलमण्याची खरी जागा राणीच्या मुकुटावरच! दगडाने त्याची बरोबरी करू नये आणि म्हणे जगातला प्रत्येक माणूस राजा व्हावा ! तुला वेड नाही ना रे लागले?... माणसाने स्वत:तले श्रेष्ठत्व काढून टाकले तर, तू म्हणतोस त्याप्रमाणे हे जग चंद्र प्रकाशासारखे शीतल दिसणार नाही; तर मेलेल्या अगणित किड्यांच्या राशीसारखे!....... इतरांपासून आपण वेगळे आहोत हे दाखविण्यासाठी प्रत्येक माणूस प्रयत्न करीत असतो. हा प्रयत्न म्हणजेच संघर्ष ! हा संघर्ष आदि-अंतापावेतो राहणार आहे. कोणी राजा, कोणी दास, कोणी श्रेष्ठ, कोणी नीच ! कोणी धनवान, कोणी कंगाल ! या भेदाला अंत नाही.''[२०] असे म्हणून त्याच्या छातीत बाण खुपसते.

यातून ऋषिकन्येचा घमेंडीपणा, उद्दामपणा, मनात खोलपर्यंत रुतून बसलेली जातियता, सौंदर्याच्या आड असणारे कौर्य दिसून येते.

**४.७ सब्बबुद्ध भिक्कू**

आपली संपूर्ण वस्ती जाळल्यामुळे, वस्तीतील सर्व लोकांना क्रूरपणे मारल्यामुळे आणि स्त्रियांवर केलेल्या अत्याचारामुळे सूडाने पेटलेला नागनाथ जेव्हा

शस्त्र हातात घेऊन नगराच्या दिशेने चालला होता तेव्हा त्याला वाटेत एक सब्बबुद्ध भिक्कू भेटतात. ते अतिशय नम्र, शांत व तत्त्वज्ञ पुरुष असतात. त्यांच्या सहवासाने नागनाथ भारावून जातो. त्याच्या कलंकित गणल्या गेलेल्या शरीरास सब्बबुद्ध भिक्कू स्पर्श करतात. नागनाथच्या मनातील सर्व राग, मत्सर ते दूर करतात. त्यांच्या बौद्धतत्त्वज्ञानाने नागनाथ अक्षरश: भारावून जातो. ''अरे, भुंग्याने लाकूड पोखरावे त्याप्रमाणे तुझा देह दु:ख, व्यथा, वेदना यांनीच पोखरला आहे. अशा तऱ्हेने तू कुठेही गेलास तरी दु:खाचीच सीमा ओलांडता यायची नाही. हे विश्व असीम आहे. जन्म आणि मृत्यू यांच्यामधील प्रदेशात दु:खाचे तृण आहे. हे तृण तुडवत जाण्यापेक्षा थोडा मन:संयम करून व हाताची थोडी फडफड करून तू आयुष्यभर चार-पाच रंग का उधळून देत नाहीस? म्हणजे तुला थोडे का होईना लाल फळाचे सुख व समाधान मिळेल.''[२१] अशा तात्विक भाषेतून सब्बबुद्ध भिक्कू नागनाथच्या मनातील औदासीन्य कमी करण्याचा प्रयत्न करतात. त्याचा परिणाम म्हणून नागनाथचे 'विश्वानंद' मध्ये रुपांतर होते. तो भिक्कूंच्या जथ्यात सामील होतो. भिक्कूंच्या सहवासाने नागनाथ त्याच्या मनातील प्रश्न विसरतो. ते त्याला अष्टांगमार्ग समजावून सांगतात. भिक्कूंची वैष्विक वृत्ती येथे समजून येते. येथे गौतम बुद्धाने अंगुलीमालाचे केलेले मनपरिवर्तन या गोष्टीची आठवण येते.

पण दुर्दैवाने नागनाथला एक ब्राह्मण ओळखतो व राजाकडून सर्व भिक्कू मारले जातात. त्यात सब्बुद्ध भिक्कूही मरत पावतात.

अशा प्रकारे नागनाथ, सागला, छन्ना, ऋषिकन्या, सब्बबुद्ध भिक्कू, वृद्ध या महत्त्वाच्या व्यक्तिरेखांच्या सहाय्याने ही कादंबरी आकार घेताना दिसते. या

व्यक्तिरेखांबरोबर उन्ना, विसपाल, अम्मान, अस्सगुप्त, ऋषीमुनी, नागनाथची आई, पत्नी, वृद्ध स्त्री, मांत्रिक, योगी ब्राह्मण याही व्यक्तिरेखा कथानकाला पुढे नेण्यास मदत करतात.

## ५. 'शूद्र' मधील पौराणिक वातावरण :

वर्तमानातील कथेला पुराणाचा अर्थ देऊन उपेक्षितांच्या समूहमनाचे दुःख चित्रित करण्याचा प्रयत्न 'शूद्र' या कादंबरीत पौराणिक वातावरणाचा आधार घेऊन करण्यात आला आहे. कोणत्याही कादंबरीतील वातावरणाचा उपयोग कथानक आणि व्यक्तिरेखा ह्यांच्यातील रहस्य उलगड्यात होतो. कादंबरीत घडणाऱ्या घटना कोणत्या ना कोणत्या स्थळी आणि काळी घडलेल्या असतात. कादंबरीत स्थल व काल ह्यांचे वर्णन येणे म्हणजेच 'वातावरण' होय. 'शूद्र' मधील वातावरण पुराणकाळाच्या पार्श्वभूमीवरून पुढे सरकताना दिसते. हा कालखंड नक्की सांगता येण्यासारखा जरी नसला तरी तो पौराणिक वातावरणाची अनुभूती देताना दिसतो, चातुर्वर्ण्यावर आधारित समाजव्यवस्था, ऋषिमुनींच्या काळातील आश्रम, कर्मकांडांचे माजलेले स्तोम, ब्राह्मण-क्षत्रियांचे वर्चस्व यासारख्या गोष्टीतून 'शूद्र' मधील वातावरणास पुराणकाळाचाच स्पर्श असल्याचे दिसून येते.

''कथानकात वास्तवता येण्यासाठी वातावरणनिर्मितीची आवश्यकता असते. व्यक्ती व घटना यांच्या चित्रणाला उठाव मिळेल इतपतच त्यास महत्त्व द्यावे.''[२२] असे जान्हवी संत म्हणतात ते खरे आहेच पण 'शूद्र' मध्ये असणारे पौराणिक वातावरण हाच खरा या कादंबरीचा आत्मा आहे. त्यामुळे 'शूद्र' च्या कथानकास वास्तवता आणण्यासाठी या पौराणिक वातावरणाचाच मोठा हातभार असल्याचे दिसून येते.



BALASAHEB ... LIBRARY ... KOLHAPUR

वेंगयन राज्य, वत्तनीया नगर, सब्बबुद्ध भिक्कूंची गुहा, त्यातील विहार, ऋषिमुनींचा आश्रम, राजा आणि त्याचे उन्मत्त दास, राजाकडून आणि उच्चवर्णीयांकडून अस्पृश्यांची होणारी पिळवणूक, अन्याय-अत्याचार हे सर्व या पौराणिक वातावरणाचे अविभाज्य घटक आहेत. ''आपण शूद्र म्हणून जन्माला आलो व शूद्र म्हणूनच मरणार.'' या चक्रावलेल्या अवस्थेतील नागनाथच्या सूडाने पेटलेल्या 'शूद्र' मधील कथानकास पुराणकाळातील वातावरणाचा स्पर्श आहे. सुधाकर गायकवाड यांची ही कादंबरी इतर दलित कादंबऱ्यांपेक्षा वेगळी ठरते ती यामुळेच.

### ६. 'शूद्र'मधील सामाजिकता :

मुलतःच दलित कादंबरीकार सामाजिकतेच्या बांधिलकीतूनच दलित कादंबरीची निर्मिती करत असल्यामुळे सामाजिकता हे दलित कादंबरीचे प्रमुख वैशिष्ट्य ठरणे स्वाभाविक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली वैचारिकता अधिष्ठानभूत मानून दलित कादंबरीकाराने परंपरागत चालत आलेली अस्पृश्यता, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रद्धा, भूक या सर्वांचे चित्रण करून त्यांना दूर सारण्याचा प्रयत्न केला. आत्मशोध, आत्मभान आणि आत्मविश्वास यांच्या सहाय्याने दलित कादंबरीकारांनी समाजजागृतीबरोबरच नवसमाज निर्मितीचा प्रयत्न केला आहे. उच्चवर्णीयांकडून होणाऱ्या अवहेलनेविरुद्ध केलेला संघर्ष प्रत्यक्ष अनुभवलेले दलित जीवन प्रस्थापित पांढरपेशी वर्गासमोर मांडून दलितांमधील अस्मिता जागृत करण्याचे काम दलित कादंबरीकाराने केले ते या सामाजिकतेतूनच.

१ सप्टेंबर १९४५ साली प्रकाशित झालेल्या 'दलितसेवक' या नियतकालिकात संपादक काकासाहेब बरवे यांनी जातिव्यवस्थेचे चित्रण केले आहे. ते म्हणतात

"हिंदू समाज व हिंदू धर्म यांचा एक किल्ला बनला आहे. बाहेरून आत कोणी शिरू नये म्हणून जन्मसिद्ध वर्णव्यवस्थेचा मोठा खंदक बनविण्यात आला आहे. किल्ल्याच्या आतही एकमेकांपासून पृथक अशी अनेक जातीरूप घरे व प्रत्येक घरात पृथक अशा पोटजातीरूप खोल्या बनविण्यात आल्या आहेत. व त्या सर्वांची दारे बंद केली असून त्यात दळणवळण होत नाही."[२३] ही परिस्थिती लक्षात घेऊन दलित कादंबरीकाराने ही जातिव्यवस्थेची कवाडे आणि कर्मकांडांच्या भल्या मोठ्या भिंती उद्ध्वस्त करण्याचा चंग बांधला तो या सामाजिक बांधलकीतूनच.

सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' मधील नागनाथ हा आपल्या दलित बांधवांना खडबडून जागे करतो. एका नव्या मार्गाने जाण्यासाठी प्रेरणा देतो. आपल्याबरोबर असणाऱ्या शूद्रातिशूद्र लोकांना बंधमुक्तीचा मार्ग समजावून देऊन नागनाथ माणुसकीचे ध्येय प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करतो. ही एक प्रकारची सुधाकर गायकवाड यांच्यासारख्या दलित कादंबरीकाराने स्वीकारलेली सामाजिक बांधिलकीच आहे.

अन्यायाविरुद्ध लढणारा आण्णा भाऊंचा 'फकिरा', 'वारणेचा वाघ' मधील सत्तू, अशोक लोखंडे यांच्या 'निष्ठा' मधील यशवंत, माधव कोंडविलकर यांच्या 'छेद' मधील सुधीर भंडारे, विजय शिरसट यांच्या 'कुस्ती' मधील प्रकाश गायकवाड, योगेंद्र मेश्राम यांच्या 'माझा गाव कुठाय?' मधील चेतव ही सर्व मंडळी आणि सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' मधील शूद्राशूद्र भेदभाव संपवण्याची प्रतिज्ञा केलेला नागनाथ हे सगळेच नायक आपले वैयक्तिक व सामाजिक स्तरावरील अनुभव व्यक्त करत करत जातियता, वर्णव्यवस्था याविरुद्ध बंड करून उठलेले आहेत हे केवळ सामाजिक बांधिलकीतूनच.

'शूद्र' मध्ये "छन्ना, अम्मान, अस्सगुप्त व सागला याना नागनाथ गुप्तपणे धनुर्विद्येचे शिक्षण देऊ लागला. थोड्याच दिवसात ते धुनर्विद्येचे, भालाफेकीचे नि कट्यार चालविण्याचे शिक्षण देऊ लागले. आता छन्ना, अम्मान, अस्सगुप्त व सागला यांच्यावर वस्तीची जबाबदारी सोपवून आपण दक्षिणेत जावे तेथील बांधवांच्या आयुष्यावर वाढलेले शेवाळ नाहीसे करून त्यांचा नदीचा एकसंघ प्रवाह करावा असे त्यास वाटू लागले. केवळ पिळलेल्या आतड्यांसाठी ब्राह्मण-क्षत्रियांच्या पायाखालच्या मातीला नाक लावण्याचे दुर्भाग्य आता संपत आले असा त्याला विश्वास वाटू लागला."[२४] हा नागनाथचा अस्पृश्यांच्या मुक्तीचा प्रयत्न सुधाकर गायकवाड रेखाटतात ते या सामाजिकतेच्या बांधिलकीतूनच.

**७. सारांश :**

१९६० नंतर दलित कादंबरीचा जो प्रवाह आला त्याने आशय-अभिव्यक्तीची बंधने झुगारून संख्येपेक्षा गुणात्मक लेखनावर भर दिला आहे. प्राचीन काळापासून चालत आलेल्या अस्पृश्यतेला आणि तिच्या वेदनेला अधोरेखित करताना सुधाकर गायकवाड यांच्या 'शूद्र' कादंबरीने जातिव्यवस्थेने आणि कर्मकांडाने बरबटलेल्या समाजव्यवस्थेवर दृष्टिक्षेप टाकला आहे. ब्राह्मण-क्षत्रियांची लाचारी झुगारून दलितांनी संघर्षप्रवण होण्याकरता 'नागनाथ'च्या माध्यमातून लेखक 'शूद्र' मधून क्रांतिविचार मांडताना दिसतात.

इतर दलित कादंबऱ्यांपेक्षा 'शूद्र' ही अतिशय वेगळी कादंबरी आहे. निवेदनातील सहजता व प्रमाणभाषेचा ओघवता वापर यांच्या सहाय्याने ही कादंबरी आकार घेताना दिसते. वेदना-विद्रोहाबरोबरच भाषेतील माधुर्य आणि लालित्य

वाचकाचे लक्ष वेधून घेते. अस्पृश्यतेचे, भूकेचे, अंधश्रद्धेचे, पिळवणूकीचे चित्रण करत असताना 'शूद्र' मध्ये प्रादेशिकतेचे, निसर्गसौंदर्याचे दर्शनही घडून जाते. 'शूद्र' मध्ये येणाऱ्या व्यक्तिरेखा उठावदार तर आहेतच शिवाय त्या कथानकाला पुढे नेण्याचे, त्यात प्रभाव पाडण्याचे काम करतात. कमीतकमी पात्रांच्या सहाय्याने जास्तीत जास्त आशय निर्माण करण्याचे काम या व्यक्तिरेखा करतात. नागनाथ, त्याचे मित्र, आई, वडील, पत्नी, भाऊ, ऋषी, त्यांची कन्या, सब्बबुद्ध भिक्कू या सर्वच व्यक्तिरेखा कथानकाला उठावदार बनवतात.

'शूद्र'मधील कालखंड नक्की सांगता येत नसला तरी तत्कालीन समाजव्यवस्था, आश्रमव्यवस्था, कर्मकांड, उच्चवर्णीयांचे वर्चस्व यासारख्या गोष्टीतून ही कादंबरी पौराणिक वातावरणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण होताना दिसते. या कादंबरीतील सामाजिकता शूद्रातिशूद्रांना बंधमुक्तीचा मार्ग दाखवताना दिसते. अस्पृश्यांच्या मुक्तीसाठी या कादंबरीचा नायक हातात शस्त्र घेतो. प्रसंगी मरणही पत्करतो ते त्याच्यातील सामाजिक बांधिलकीतूनच.

अशा प्रकारे 'शूद्र' ही कादंबरी सामाजिकदृष्ट्या तर सुंदर आहेच त्याचबरोबर वाङ्मयीनदृष्ट्याही वेगळी ठरते. तिच्या पृष्ठसंख्येपेक्षा तिच्या व्यापक व मानवतावादी आशयसंपन्नतेतच तिचे खरे यश आहे.

## ८. निष्कर्ष

१. दलित कांदबरीकार अभिव्यक्तीपेक्षा आशयाला महत्त्व देतात.

२. 'शूद्र' या कादंबरीतील संघर्ष उभा करताना नेहमीच्या दलित कादंबरीचे आशय-अभिव्यक्तीचे स्वरूप न स्वीकारता ही कादंबरी आपले स्वत:चे अस्तित्व साकारताना दिसते.

३. सुधाकर गायकवाड यांच्या निवेदनात सहजता आहे. त्यांची अल्पाक्षरी भाषा लहान-लहान वाक्यातून दिसून येतेच, त्याचबरोबर त्यातील आलंकारिकताही या कादंबरीतील तृतीयपुरूषी एकवचनी निवेदनाला सौंदर्य प्राप्त करून देते.

४. प्रमाणभाषेबरोबरच रूपक, प्रतिमा, प्रतीक यांचा वापर सुधाकर गायकवाड परिणामकारपणे करतात.

५. प्राचीन काळातील पार्श्वभूमीवर घडणारे कथानक असल्याने लेखकाने बोलीभाषेच्या वापराचा अट्टहास न धरता प्रमाणभाषेतच लेखन केलेले आहे.

६. 'शूद्र' मधील प्रादेशिकता व निसर्गवर्णन हे केवळ यायचे म्हणून येत नाही तर कथानकाचा तो अविभाज्य घटक आहे.

७. 'शूद्र' मधील व्यक्तिरेखा मोजक्याच असल्या तरी त्या कथानकाशी समरस होताना दिसतात. कादंबरीचा आशय समृद्ध करताना दिसतात.

८. 'शूद्र' मधील पौराणिक वातावरण हाच या कादंबरीचा आत्मा आहे. कथानकात वास्तवता निर्माण करण्याचे काम हे वातावरण करते.

९. 'शूद्र' मधील सामाजिकता जातिव्यवस्थेची कवाडे आणि कर्मकांडाच्या भल्या मोठ्या भिंती उद्ध्वस्त करण्याच्या हेतूनेच लेखकाने स्वीकारलेली आहे.

१०. 'शूद्र' मधील नागनाथ 'विद्रोह' आणि 'बुद्धपुरस्कृत मानवतावाद' यांच्या द्विधावस्थेत सापडलेला असून 'विद्रोह' हा पहिला टप्पा व 'संवाद' ही त्याची अंतिम उपलब्ध आहे हे विसरला आहे. त्यामुळेच तो आपला अंत ओढवून घेतो.

# संदर्भसूची


| | | |
|---|---|---|
| १. | सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे<br>द्वितीयावृत्ती – २००५ |
| २. | सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ७९ |
| ३. | सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ५४ |
| ४. | बा. स. हाटे | 'युगविधान'<br>संबोधी प्रकाशन, मुंबई<br>प्रथमावृत्ती १९८३<br>पृष्ठ |
| ५. | सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>पृष्ठ क्र. १४ |
| ६. | सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. १ |
| ७. | सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ४८ |
| ८. | अशोक व्हटकर | 'मेलेलं पाणी'<br>पॉप्युलर प्रकाशन, मुंबई<br>पहिली आवृत्ती – १९८२<br>पृष्ठ क्र.६३ |
| ९. | सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>पृष्ठ क्र. ३२ |

| | |
|---|---|
| १०. डॉ. आनंद यादव | ''ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या''<br>मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.<br>प्रथमावृत्ती – १९८१<br>पृष्ठ क्र. ८० |
| ११. सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>(पृष्ठ क्र. ८२) |
| १२. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. २६ |
| १३. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. २८ |
| १४. जान्हवी संत | ''कादंबरी – एक वाङ्मय प्रकार''<br>मोघे प्रकाशन, कोल्हापूर.<br>प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९७१<br>पृष्ठ क्र. ६१ |
| १५. सुधाकर गायकवाड | 'शूद्र'<br>पृष्ठ क्र. ८२ |
| १६. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ०८ |
| १७. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. १७ |
| १८. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. १७ |
| १९. सुधाकर गायकवाड | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ३३ |

२०. सुधाकर गायकवाड — तत्रैव
पृष्ठ क्र. १

२१. सुधाकर गायकवाड — तत्रैव
पृष्ठ क्र. ५५

२२. जान्हवी संत — ''कादंबरी – एक वाङ्मय प्रकार
मोघे प्रकाशन, कोल्हापूर.
प्रथमावृत्ती, नोव्हेंबर १९७१
पृष्ठ क्र. ८९

२३. संपा. काकासाहेब बरवे — 'दलितसेवक' नियतकालिक
१ सप्टेंबर १९४५

२४. सुधाकर गायकवाड — 'शूद्र'
पृष्ठ क्र. २४